# तेलाच्या भडक्यामुळे महागाईचे चटके अटळ

## प्रत्येक १० डॉलरच्या भडक्याने ०.६ टक्क्यांची चलनवाढ

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**पश्चिम आशियातील** युद्धामुळे खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीचा भडक्याचा भारतातील महागाईवर भयंकर परिणाम होणार आहे. भावात पिंपामागे सरासरी १० डॉलरची वाढ झाल्यास देशातील किरकोळ महागाईत ५५ ते ६० आधारबिंदूची (०.६ टक्के) वाढ होईल, असा अंदाज केअरएज ग्लोबल आयएफएससीच्या मुख्याधिकारी रेवती कस्तुरे यांनी सोमवारी वर्तविला.

कस्तुरे म्हणाल्या की, किरकोळ महागाई निर्देशांकावर इंधनाच्या किमतीचा प्रभाव खूप मोठा आहे. खनिज तेलाच्या आयात किमतीतील वाढीची झळ ही सुरूवातीला काही काळ प्रत्यक्ष इंधन दरवाढ न करता तेल विपणन कंपन्या सोसतील. परंतु, किमती दीर्घ काळ चढत राहिल्यास ही ग्राहकांपर्यंत दरवाढीची झळ निश्चितच पोहचेल. भारत हा खनिज तेलासाठी प्रामुख्याने पश्चिम आशियातील स्रोतांवर अवलंबून आहे. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या १० महिन्यात भारताच्या खनिज तेल व पेट्रोलियम आयातीपैकी ५१ टक्के पुरवठा पश्चिम आशियातूनच झाला आहे. सध्या जागतिक पातळीवर खनिज तेलाची किंमत प्रति पिंप ११५ डॉलरच्या वर असून, त्यामुळे आयात खर्चात मोठी वाढ झाली आहे. यातून पुढे जाऊन किरकोळ महागाईत वाढीचा धोका दिसून येतो.

खनिज तेलाच्या वाढत्या किमतीमुळे देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होऊ शकतो. यामुळे चालू खात्यावरील तूट आणखी वाढण्याची शक्यता आहे. खनिज तेलाच्या किमतीत प्रति पिंप १० डॉलरची वाढ झाल्यास पुढील आर्थिक वर्षात चालू खात्यावरील तुटीत ३० ते ४० आधारबिंदूंनी वाढ होईल.

# ‘रुपया अगदी ठणठणीत!’

## डॉलरपुढे ९५ पार लोटांगणानंतरही अर्थमंत्र्यांचा निर्धास्त सूर

**पीटीआय, नवी दिल्ली**

**अमेरिकी डॉलरच्या** तुलनेत भारतीय रुपया अगदी सुस्थितीत असून, इतर विकसनशील अर्थव्यवस्थांच्या तुलनेत देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती देखील भक्कम आहे, असा निर्वाळा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी दिला.

पश्चिम आशियातील युद्धामुळे रुपयाचे सातत्याने अवमूल्यन सुरू आहे. हा संघर्ष २८ फेब्रुवारीला सुरू झाला तेव्हापासून रूपयाच्या मूल्यात ४.१ टक्क्यांची घसरण झाली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया सोमवारी ९५.२२ च्या आजवरच्या सर्वात खालच्या पातळीपर्यंत गडगडला. चालू आर्थिक वर्षात त्यात डॉलरच्या तुलनेत ९.९ टक्क्यांची घसरण झाली असून, रुपयासाठी गेल्या १४ वर्षांतील हे सर्वात आव्हानात्मक वर्ष ठरले आहे.



### महागाईत घसरणीचा दावा

अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी म्हणाले की, रूपयाचे मूल्य बाजारपेठेतील मागणी-पुरवठ्याचे समीकरण ठरविते. सरकार व रिझर्व्ह बँक रुपयाच्या मूल्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. किरकोळ महागाईचा दर २०२०-२१ मध्ये ६.२ टक्के आणि २०२४-२५ मध्ये तो ४.६ टक्क्यांवर होता. हा दर चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते फेब्रुवारी या कालावधीत १.९ टक्क्यांवर उतरला आहे. बहुतांश अत्यावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर आहेत अथवा त्यात घसरण होत आहे.

या पार्श्वभूमीवर विचारण्यात आलेल्या पुरवणी प्रश्नावर लोकसभेत लेखी उत्तरात सीतारामन यांनी वरील निर्वाळा दिला. त्या म्हणाल्या की, भारतीय अर्थव्यवस्था भक्कम स्थितीत असून, संपूर्ण जगाकडून आपल्या वित्तीय शिस्तीचे कौतुक होत आहे. आपली परकीय चलन गंगाजळीही चांगली आहे. इतर विकसनशील अर्थव्यवस्थांच्या तुलनेत रुपयाचे मूल्य ठीक पातळीवरच आहे.

केवळ रुपयाचेच अवमूल्यन झालेले नाही. पश्चिम आशियातील संघर्ष सुरू झाल्यापासून प्रमुख आशियाई चलनांचे अवमूल्यन झाले आहे. दक्षिण कोरियातील वॉन, थायलंडचे बात आणि फिलिपिन्सचे पेसो या चलनांचे रुपयापेक्षा किती तरी जास्त अवमूल्यन झाले आहे. डॉलरच्या तुलनेत वॉनचे अवमूल्यन ४.६ टक्के, बातचे अवमूल्यन ५.५ टक्के आणि पेसोचे अवमूल्यन ४.८ टक्के आहे, असेही सीतारामन यांनी लेखी उत्तरात स्पष्ट केले. मागे ऑक्टोबर २०२२ मध्ये मूल्य वेगाने ढासळत असलेल्या रुपयाबद्दल अर्थमंत्र्यांना प्रश्न केला गेला असता, ‘रुपया गडगडत नाही, तर डॉलर मजबूत होत आहे’ असे त्यांनी उत्तर दिले होते. त्याच उत्तराची त्यांनी सद्यःस्थितीतही पुनरावृत्ती केली.

# पन्नास हजारांवरील व्याज उत्पन्नावरच ‘टीडीएस’!

**पीटीआय, नवी दिल्ली**

**बँकिंग नियमन** कायदा १९४९ मधील तरतुदीनुसार कार्यरत देशातील सर्व बँकांना वार्षिक ५० हजार रुपयांपेक्षा जास्त व्याजापोटी असलेल्या उत्पन्नावरच उद्गम कर कपात (टीडीएस) करता येईल, अशी माहिती प्राप्तिकर विभागाने सोमवारी दिली.

व्याज उत्पन्नावर टीडीएस कपातीची मर्यादा ४०,००० रुपयांवरून ५०,००० रुपये करण्याची महत्त्वाची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली होती. बँकांमधील मुदत ठेवी (एफडी), आवर्ती ठेवी (आरडी) आणि पोस्ट ऑफिसमधील ठेवींवर मिळणाऱ्या व्याजासाठी ही नवीन मर्यादा लागू असून, येत्या १ एप्रिल २०२६ पासून, म्हणजे आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मिळविल्या जाणाऱ्या एकाच बँकेच्या सर्व शाखांमधील एकत्रित व्याज उत्पन्नावर ही मर्यादा लागू होईल. प्राप्तिकर कायद्यानुसार, ज्येष्ठ नागरिकांसाठी ही मर्यादा १ लाख रुपये आहे.

अंमलबजावणीबाबत गोंधळ दूर करणारे स्पष्टीकरण सोमवारी करण्यात आले. याबाबत प्राप्तिकर विभागाने समाज माध्यमावर दिलेल्या माहितीनुसार, बँकिंग कंपन्यांच्या व्याख्येतील या तांत्रिक बदलामुळे, ‘बँकिंग नियमन कायदा, १९४९’ अंतर्गत परवाना असलेल्या सर्व वित्तीय संस्था (ज्यामध्ये खासगी, सरकारी, विदेशी आणि नागरी सहकारी बँकांचा समावेश आहे) आता एकाच छत्राखाली आल्या आहेत. त्यामुळे काही सहकारी बँकांना या मर्यादेचा फायदा मिळेल की नाही, याबाबत आता साशंकता नसेल.

# सोन्यातील १५ टक्क्यांची घसरण, सोने-तारण कर्ज व्यवसायाच्या मुळावर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबईः** सोन्याच्या किमतीतील अकस्मात घसरणीमुळे देशातील सोने-तारण कर्ज क्षेत्रात जोखीम वाढली असून, संकटाची स्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा ‘फिच रेटिंग्ज’च्या अहवालाने सोमवारी दिला. विशेषतः बँकेतर वित्तीय संस्थांमध्ये (एनबीएफसी) या संबंधाने मजबूत जोखीम नियंत्रणाची गरजही अहवालाने अधोरेखित केली.

इराणवरील हल्ला २८ फेब्रुवारी रोजी सुरू झाला आणि तेव्हापासून २ टक्क्यांपेक्षा जास्त मजबूत झालेल्या अमेरिकी डॉलरच्या दबावापुढे, संपूर्ण मार्च महिन्यात आतापर्यंत सोन्याच्या किमती जवळपास १५ टक्क्यांनी घसरल्या आहेत. ऑक्टोबर २००८ नंतरची सोन्यातील ही सर्वात मोठी मासिक घसरण आहे. मात्र सोन्याच्या किमती अस्मानाला भिडले असताना कर्ज घेतले गेले असल्याने, ताजी घसरण ‘गोल्ड-लोन’ क्षेत्रासाठी चिंतेचा मुद्दा आहे, असे आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था ‘फेच रेटिंग्ज’चे मूल्यांकन आहे.

भारतात वेळप्रसंगी घरातील दागदागिने गहाण ठेऊन त्यावर पैसे उसने घेऊन गरज भागवण्याची जुनी परंपरा आहे. याच परंपरेवर आधारीत आधुनिक सोने-तारण कर्ज व्यवसाय गेल्या काही वर्षात चांगलाच बहरात आहे. अल्प-मुदतीच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी सोने-तारण कर्जे सामान्यतः घरातील सोन्याच्या दागिने तारण ठेऊन घेतली जातात. मात्र सोन्याच्या किमती घसरल्यास, कर्जदात्या बँका व वित्तीय संस्थांचे ‘लोन-टू-व्हॅल्यू’ (एलटीव्ही) अर्थात कर्जाच्या तुलनेत सोन्याचे मूल्य हे समीकरण बिघडते. अर्थात कर्ज मिळविताना तारण म्हणून ठेवल्या गेलेल्या मालमत्तेचे मूल्य कमी होऊ शकते. अशा स्थितीत कर्जदाराने जर कर्ज थकवल्यास, तारण मालमत्तेतून ते वसूल करता येणे कर्जदात्यांसाठी अशक्य बनेल, असा या संस्थेने अहवालात दिलेला इशारा आहे.

# परकीय गुंतवणूकदारांची विक्रमी माघार

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबईः** युद्धाच्या छायेतील मार्च महिन्यात परकीय गुंतवणूकदारांनी देशांतर्गत शेअर बाजारातून १.१४ लाख कोटी रुपये (सुमारे १२.३ अब्ज डॉलर) काढून घेतले. पश्चिम आशियातील वाढता तणाव, रुपयाची घसरण आणि तेलाच्या वाढत्या किमतीचा भारताच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामाबाबतच्या चिंतांमुळे, मार्च महिना हा भांडवल निर्गमनाच्या दृष्टीने सर्वात वाईट महिना ठरला. संपूर्ण आर्थिक वर्षात त्यांनी विक्रमी १९.६९ अब्ज डॉलर किमतीचे भारतीय समभाग विकले आहेत.



अत्यंत अस्थिर राहिलेल्या मार्चमध्ये निफ्टी आणि सेन्सेक्स या दोन्ही प्रमुख निर्देशांकात ५.५ टक्के ते ६ टक्के घसरण झाली आहे. सेन्सेक्स उच्चांकी स्तरावरून सुमारे ४,००० अंशांनी कोसळला आहे. तर मावळत्या आर्थिक वर्षात या निर्देशांकांनी अनुक्रमे सुमारे ५.१ टक्के आणि ७.१ टक्क्यांची घसरण नोंदवली आहे. ही त्यांची गत सहा वर्षातील, २०२० नंतरची सर्वात खराब कामगिरी ठरली आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. न.उप.अ./शा.पा.सु.क./१२३२८/पू.उप./दि.३०.०३.२०२६

| | ई निविदा सूचना |
|---|---|
| खाते | नगर अभियंता |
| उपविभाग | नगर उप अभियंता (शाळा पायाभूत सुविधा कक्ष) |
| विषय | एम/पूर्व विभागातील गोवंडी व्हिलेज येथील नगर भूमापन क्र. १ वरील आधार केंद्र, केअर सेंटर व रफीनगर महानगरपालिका शाळेचे प्रस्तावित निष्कासन व पुनर्बांधणी करणेबाबत. (Tender Document ID-2026_MCGM_1291319_1) |
| निविदा विक्री | दि. ३१.०३.२०२६ वेळ : ११.०० (सकाळ) पासून दि. ३०.०४.२०२६ वेळ : १२.०० (दुपार) पर्यंत |
| संकेतस्थळ | http://mahatenders.gov.in |
| संपर्काधिकारी नाव, दूरध्वनी (कार्या.) व ई-मेल पत्ता | श्री. शशिकांत व. मेमाणे, सहाय्यक अभियंता (शा.पा.सु.क.) एम/पूर्व व एम/प विभाग भ्रमणध्वनी क्र. ९२२२११६८७० ई-मेल-aesic01.ce@mcgm.gov.in |

सही/-
श्री. अविनाश अ. विश्वासराव
नगर उप अभियंता
(शाळा पायाभूत सुविधा कक्ष)

PRO/3433/ADV/2025-26
झाडे लावा, झाडे जगवा

**मध्य रेल्वे**
**खुली निविदा सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी), १ ला मजला, पार्सल कार्यालय इमारत, पीएफ क्र. १४ आणि १५ वर, मध्य रेल्वे, मुंबई सीएसएमटी ४००००१ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून दोन ई-निविदा (खुली निविदा) मागवीत आहेत. निविदा सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ २८/०४/२०२६ रोजी १५.०० वा. पर्यंत आहे. **अ. क्र. १ निविदा सूचना क्र.:** सीआर-बीबी-टेले-२०२६-३० कामाचे नावः मुंबई विभागामधील विविध ठिकाणी पॅसेंजर इन्फोर्मेशन सिस्टीम, पब्लिक अड्रेस सिस्टीम आणि अन्य दूर संचार मत्तांचा पुरवठा, बसविणे, तपासणे आणि कार्यान्वयन. **कामाचे अंदाजे मूल्य (रू. मध्ये):** २०,११,७३,८६.९७, **इरठे (रू.मध्ये):** ३८,५९,९००.०० **समाप्तीचा दिनांक आणि वेळ:** २८/०४/२०२६ रोजी १५:०० वा. वैधता: ९० दिवस. **पूर्तता कालावधी:** १२ महिने. शुद्धिपत्रकासह निविदेचा पूर्ण तपशील भारतीय रेल्वेचे अधिकृत संकेतस्थळ www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. पूर्ण निविदा कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. निविदेचा पूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी) यांचे कार्यालय, मुंबई सीएसएमटी यांच्या "सूचना फलक" वर देखील उपलब्ध आहे. **सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७/ दिनांकित १५.०६.२०१७ अनुसार मान्यताप्राप्त आहे.** 1036

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**U.P. HANDICRAFTS DEVELOPMENT AND MARKETING CORPORATION LTD.**
ODOP Marketing & Branding Facilitation Centre,
Niryat Bhawan, 8 Cantt. Road, Kaiserbagh, Lucknow-226001
Website : www.uphdmc.in, Email : uphdmcho@gmail.com

**E-TENDER NOTICE**

Proposals are invited for sale of Handicraft / Textile / Handloom / ODOP Products in its Gangotri Showroom, located at UP Bhawan, Navi Mumbai under the 'Sale & Return Scheme'. Details are available on https://etender. up.nic.in. Proposals can be submitted only online on https://etender.up.nic.in. The last date for submission of Proposals is 13.04.2026. M.D. reserves the right to cancel one/all proposals without assigning any reason

*Managing Director*

**डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** बी- ८७, एमआयडीसी, अंबड, नाशिक - ४२२०१०
**सीआयएन :** L32109MH1982PLC028280
**दूरध्वनी क्र.** २५३ २३८२२३८ **फॅक्स क्र.** २५३ २३८२९२६
**ईमेल आयडी:** secretarial@dmltd.in **वेबसाईट :** www.deltamagnets.com

**समभागधारकांना दुसरी सूचना**
**भौतिक प्रतिभूतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशन करिता विशेष विंडो**

भारतीय प्रतिभुती विनियमन मंडळ ("सेबी") ने त्यांच्या परिपत्रक सेबी / एचओ / ३८ / १३ / ११ (२) २०२६- एमआयआरएसडी - पीओडी / आय / ३७५० / २०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ नुसार, दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री/खरेदी केलेल्या भौतिक प्रतिभुतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशनकरिता विशेष विंडो उघडली आहे. हि विशेष विंडो **दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीकरिता खुली** राहील.

भौतिक समभाग धारण करणारे गुंतवणुकदार त्यांना मंजूर झालेली संधी उपरोल्लेखित परिपत्रकामध्ये उल्लेखिल्यानुसार आवश्यकता/शर्तींचे अनुपालन केल्यानंतर प्राप्त करू शकतात. उपरोल्लेखित परिपत्रक सेबी वेबसाईट म्हणजेच https://www.sebi.gov.in/ legal/ circulars/jan-2026/ease-of-doing-investment-special-window-for-transfer-and-dematerialisation-of-physical-securities_99411.html वर उपलब्ध आहे.

वरील प्रकरणात कोणतेही प्रश्न असल्यास, भागधारकांनी खाली उल्लेख केल्यानुसार, कंपनी निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") यांना संपर्क करावा.

**पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,**
युनिट क्र. ९, तळमजला, शिव शक्ती इंडस्ट्रियल इस्टेट,
जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई- ४०००११;
दूरध्वनी: २२४९६१४१३२
ईमेल आयडी: support@purvashare.com

**डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड करिता**
**सही/-**
**माधुरी पवार**
**कंपनी सचिव**
**एसीएस क्र. ५४६३१**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ३१ मार्च, २०२६

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**(पाणी पुरवठा प्रकल्पे विभाग)**
**नं. प्रमुख अभि./ डब्लूएसपी/ पी/ ७०३०, ३० मार्च, २०२६ चा**
**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) हे **"गारगाई पासून ते मोडक सागर पर्यंत वॉटर कन्व्हेयन्स टनेल प्रोजेक्ट, गारगाई नदीच्या पलिकडील रोलर कॉम्पॅक्टेड काँक्रिट (आरसीसी) डॅमच्या बांधकामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लामसलत (पीएमसी) सेवांची नियुक्ती व अन्य संबंधित कामे"** या कामांकरिता ऑनलाईन बोली मागवीत आहेत.

बोली महाटेंडर्स पोर्टलवरून (https://mahatenders.gov.in) डाउनलोड करता येतील.

बोली सुरू होणारी तारीख व वेळ ०१.०४.२०२६ रोजी स. ११.३० वा. पासून पुढे आहे आणि बंद होणारी तारीख व वेळ २७.०४.२०२६ रोजी दु. ०४.३० वा. पर्यंत आहे.

स्वारस्य असलेले बोलीदार अधिक तपशीलाकरिता महाटेंडर्स पोर्टलवर (https://mahatenders.gov.in) भेट देवू शकतील.

बोली कागदपत्रांची विक्री टपालाद्वारा केली जाणार नाही किंवा स्वीकारली जाणार नाहीत.

स्वाक्षरी /- ३०.०३.२६
**प्रमुख अभियंता**
**(पाणी पुरवठा प्रकल्पे)**

**पीआरओ/ ३४३५/ एडीव्ही/ २०२५-२६**
येता कणकण तापाची, तपासणी करून घ्या रक्ताची

**डेल्टा कॉर्प लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** डेल्टा हाऊस, प्लॉट क्र. १२, हॉर्नबाय वेलार्ड इस्टेट,
डॉ. ॲनी बेझंट मार्ग, कॉपर चिमणीशेजारी, वरळी, मुंबई- ४०००१८.
**सीआयएन क्र. :** L65493MH 1990PLC436790 **दूरध्वनी क्र.:** ९१-२२-४०७९४७००
**ईमेल आयडी:** secretarial@deltin.com **वेबसाईट:** www.deltacorp.in

**समभागधारकांना दुसरी सूचना**
**भौतिक प्रतिभूतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशन करिता विशेष विंडो**

भारतीय प्रतिभुती विनियमन मंडळ ("सेबी") ने त्यांच्या परिपत्रक सेबी / एचओ / ३८/१३/११ (२) २०२६- एमआयआरएसडीपीओडी / आय/ ३७५० / २०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ नुसार, दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री / खरेदी केलेल्या भौतिक प्रतिभुतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशनकरिता विशेष विंडो उघडली आहे. विशेष विंडो **दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि.०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीकरिता खुली** राहील.

भौतिक समभाग धारण करणारे गुंतवणुकदार त्यांना मंजूर झालेली संधी उपरोल्लेखित परिपत्रकामध्ये उल्लेखिल्यानुसार आवश्यकता/ शर्तींचे अनुपालन केल्यानंतर प्राप्त करू शकतात. उपरोल्लेखित परिपत्रक सेबी वेबसाईट म्हणजेच https://www.sebi.gov.in/legal/circulars/jan-2026/ease-of-doing-investment-special-window-for-transfer-and-dematerialisation-of-physical-securities_99411.html वर उपलब्ध आहे.

वरील प्रकरणात कोणतेही प्रश्न असल्यास, भागधारकांनी खाली उल्लेख केल्यानुसार, कंपनी निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") यांना संपर्क करावा.

**पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,**
युनिट क. ९, तळमजला, शिव शक्ती इंडस्ट्रियल इस्टेट,
जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई- ४०००११;
दूरध्वनी: २२४९६१४१३२
ईमेल आयडी: support@purvashare.com.

**डेल्टा कॉर्प लिमिटेड करिता**
**सही / -**
**दिलीप वैद्य**
**कंपनी सचिव आणि उपाध्यक्ष सचिवीय**
**एफसीएस क्र. ७७५०**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ३१ मार्च, २०२६

केनरा Canara Bank A Govt. of India Undertaking | सिंडिकेट Syndicate
BOBCAPS TRUST | INNOVATION | EXCELLENCE (A wholly owned subsidiary of Bank of Baroda)

**स्वीस चॅलेंज मेथडचे अनुसरण करून खुल्या लिलाव प्रक्रियेमार्फत अनुमती असलेल्या संस्थांकरिता सुप्रिम हाऊसिंग अँड हॉस्पिटॅलिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या ("एसएचएचपीएल") खात्यात स्ट्रेस्ड लोन एक्सपोजरच्या हस्तांतरणासंबंधित स्वारस्याची अभिव्यक्ती ("ईओआय") मागविणारी जाहिरात**

कॅनरा बँकेच्या (**"सीबी"/"बँक"/"धनको"**) **वतीने बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड ("बीओबीसीएपीएस"/"प्रक्रिया सल्लागार")** प्रक्रिया सल्लागार म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, याद्वारा आरबीआय (कमर्शियल बँक्स-पत जोखीमेचे हस्तांतरण व वितरण) निदेश, २०२५, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार ("आरबीआय निदेश"), आणि धोरणाद्वारा मान्यताप्राप्त बँकेचे आंतर बोर्ड कडील लागू कायद्याच्या अनुसार, समाविष्ट परंतु मर्यादित नसलेले, पात्र आणि व्याख्या केल्यानुसार पात्र एआरसीज, बँक्स, एनबीएफसीज, एआयएफआयज व अन्य अनुमती असलेले हस्तांतरिती (एकत्रीतरीत्या **"अनुमती असलेले हस्तांतरिती"** किंवा **"बोलीदार"**) यांच्याकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (**"ईओआय"**) मागवीत आहेत.

व्यवहाराचे स्वरूप : धनको बोली प्रक्रिया कागदपत्रांत ("बीपीडी") नमूद केल्यानुसार स्वीज चॅलेंज मेथड ("एससीएम") द्वारा अनुसरण करून खुल्या लिलाव प्रक्रियेमार्फत काटेकोरपणे **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", "जे काही आहे जसे आहे", "जे काही आहे तेथे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय" आयएनआर ४७०.०० कोटी (रुपये चारशे सत्तर कोटी फक्त) किमान राखीव किंमत** यासह, **"सर्व रोख"** आधारे पात्र अनुमती असलेल्या हस्तांतरितींकरिता ०१.०३.२०२६ पासून **आयएनआर ५,८६,०७,२०,१५८.७२ (रुपये पाचशे शहाऐंशी कोटी सात लाख वीस हजार एकशे अठ्ठावन्न व पैसे बहात्तर फक्त)** असलेली ३० मार्च, २०२६ रोजीप्रमाणे एकूण निधी-आधारित थकीत मर्यादा असलेली एसएचएचपीएलचे स्ट्रेस्ड लोन एक्सपोजरची विक्री हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव ठेवीत आहेत. धनको स्ट्रेस्ड लोन एक्सपोजर संबंधित कोणतेही प्रवर्तनीय, कायदा, आर्थिक किंवा अन्य कोणतीही जोखीम किंवा दायित्व गृहीत धरणार नाहीत आणि एसएचएचपीएलच्या बाबतीत कोणतेही प्रतिनिधीत्व, वॉरंटीज किंवा आश्वासनांची तरतूद करणार नाहीत.

**ईओआयचे सादरीकरण** : प्रक्रियेत सहभागी होवू इच्छिणाऱ्या पात्र अनुमती दिलेल्या हस्तांतरितींना विनंती करण्यात येते की, त्यांचे ईओआय व अन्य कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे (१) **इलेक्ट्रॉनिक प्रणालीत**, ईमेलद्वारा : cb15550@canarabank.com & project.sure@bobcaps.in; आणि प्रत्यक्ष स्वरूपात (२) श्री. सागर भद्रा - सहाय्यक उपाध्यक्ष, बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, बी-१७०४, परिनी क्रेसेन्झो, जी ब्लॉक, बीकेसी, बांद्रा (पू.), मुंबई - ४०० ५१ यांच्याकडे यथोचित निष्पादित व स्टँप्ड मूळ कागदपत्रे पाठवावीत.

**ईओआय व अन्य कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख ०६ एप्रिल, २०२६ आहे.**

**बोली प्रक्रिया कागदपत्र** : बोली प्रक्रिया कागदपत्र बीओबीसीएपीएसच्या वेबसाइटवर (www.bobcaps.in/tenders) आणि कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर (www.canarabank.bank.in) उपलब्ध आहे.

स्वारस्य असलेले व अनुमती असलेले हस्तांतरिती कोणत्याही शंका / स्पष्टिकरणाकरिता खालील प्रतिनिधींशी संपर्क साधू शकतील :

| संपर्क व्यक्ती | टेलि. क्र. | ईमेल आयडी |
|---|---|---|
| श्री. सागर भद्रा, एव्हीपी-बीओबीसीएपीएस | +९१ ७६६६४१२३९५ | project.sure@bobcaps.in |
| श्री. हेमंत गुप्ता, एसएम-बीओबीसीएपीएस | +९१ ९८१९४३६२७६ | |
| श्री. राकेश चंद्र शांडिल्य, एजीएम-सीबी | +९१ ६३६४९१७१०१ | rakeshchandra@canarabank.com |
| श्री. किशोर के माने, मुख्य व्यवस्थापक - सीबी | +८०९७५९०९४० | cb15550@canarabank.com |
| श्री. गौरव पारिक, वरिष्ठ व्यवस्थापक-सीबी | +८००५५२४०८९ | cb15550@canarabank.com |

**महत्वाची अस्वीकरणे :**
(१) ही दोन-स्तर प्रक्रिया आहे : स्तर १ यामध्ये अँकर बोलीदार ओळखण्याकरिता प्रत्यक्ष बोली प्रक्रियेचा समावेश आहे; स्तर २ यामध्ये यशस्वी बोलीदार ठरविण्याकरिता, धनकोच्या सक्षम प्राधिकरणाद्वारा अंतिम मान्यतेच्या विषयाधीन, एससीएम अंतर्गत ई-लिलावाचा समावेश आहे. (२) धनको / बीओबीसीएपीएस पूर्वोक्त वेबसाइट्सवर शुद्धिपत्र अपलोड करून, कोणतेही कारण व दायित्वाशिवाय, कोणत्याही वेळेत, काढून टाकण्याचा, मागे घेण्याचा, रद्द करण्याचा, फेरबदल करण्याचा किंवा त्यात विस्तार करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत. (३) पूर्वोक्त वेबसाइटवर प्रसिद्ध झालेले कोणतेही अपडेट्स किंवा शुद्धिपत्रांची स्वतःला माहिती करून घेण्यास पूर्णतः जबाबदार आहे.
(४) बँकेचा निर्णय अंतिम, निर्णायक व सर्व बोलीदारांना बांधील असणार आहे. (५) ही जाहीरात प्रस्ताव कागदपत्र नाही आणि धनको / बीओबीसीएपीएसच्या भागावर कोणतीही बांधिलकी किंवा बंधन नाही.

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ३१ मार्च, २०२६**

**स्वाक्षरी/-**
**द्वारा निर्गमित**
**कॅनरा बँक, एसएएमबी, मुंबई**

**संरक्षण मंत्रालय**
**(डीआरडीओ)**
**नौदल साहित्य संशोधन प्रयोगशाळा,**
**शील बदलापूर रोड, पी.ओ. आनंदनगर**
**अंबरनाथ-४२१ ५०६, जि. ठाणे**
**(फोन - ०२५१ २६२३०३९, २०२, ०७९ - फॅक्स - ०२५१ २६२३००४)**

**स्वारस्याच्या अभिव्यक्तीची सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता संचालक, एनएमआरएल, अति. अंबरनाथ हे खालील आयटमच्या प्रक्रियेकरिता स्वारस्याची अभिव्यक्ती मागवीत आहेत.

| अनु क्र. | संदर्भ क्र. | आयटमचे नाव |
|---|---|---|
| १ | एनएमआरएल/ एमएमजी / ०४०१ / ०४ / ईओआय/ सीईसी / १५३ / २०२५-२६ दिनांक १६ मार्च, २०२६ | हेल्थ मॉनिटरिंग ऑफ इम्प्रेस्ड कॅथोलिक प्रोटेक्शन (आयसीसीपी) व रेफरन्स इलेक्ट्रोड (आरई) सिस्टम्ससह युनिफॉर्म शीप हल पोटेन्शियल डिस्ट्रिब्युशन साध्य करण्याकरिता इन्टॅलिजन्ट स्वॉफ्टवेअरचा विकास. |

**१. प्रस्तावना :**
**१.१** भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने संचालक, नौदल साहित्य संशोधन प्रयोगशाळा (एनएमआरएल), अंबरनाथ, संरक्षण संशोधन व विकास संघटने अंतर्गत मुख्य प्रयोगशाळा कॅथोलिक प्रोटेक्शन अंतर्गत आयएसओ-पोटेन्शियल शीप हल साध्य करण्याकरिता इन्टॅलिजन्ट स्वॉफ्टवेअर विकास कामाकरिता कार्य हाती घेण्याकरिता पुरेसा अनुभव, तज्ज्ञ व क्षमता असलेल्या भारतीय उद्योगांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (ईओआय) मागवीत आहेत.
**१.२ ईओआयचे संक्षिप्त वर्णन** : तेथे आयएसओ-पोटेन्शियल शीप हल साध्य करण्याकरिता इन्टॅलिजन्ट स्वॉफ्टवेअरच्या विकासाकरिता विकास भागीदाराची गरज भासणार आहे.
**१.३** या ईओआयचा हेतू तत्सम कंत्राट किंवा सदर कंत्राट यशस्वीरीत्या पूर्ण केलेले सखोल ज्ञान व सिद्ध ट्रॅक रेकॉर्ड असलेल्या तांत्रिकदृष्ट्या योग्य व सक्षम अर्जदारांची अल्पसूची तयार करणे आहे. अर्जदार परिशिष्ट - १ नुसार नमूद केलेल्या पात्रता कसोट्यांची पूर्तता करण्याच्या विषयाधीन उक्त कंत्राटाचे निष्पादन करण्यास इच्छुक असले पाहिजेत.
**२. कामाची व्याप्ती : हेल्थ मॉनिटरिंग ऑफ इम्प्रेस्ड कॅथोलिक प्रोटेक्शन (आयसीसीपी) व रेफरन्स इलेक्ट्रोड (आरई) सिस्टम्ससह युनिफॉर्म शीप हल पोटेन्शियल डिस्ट्रिब्युशन साध्य करण्याकरिता इन्टॅलिजन्ट स्वॉफ्टवेअरच्या विकासाकरिता भारतीय उद्योगांची ओळख** कामाची व्याप्ती परिशिष्ट २ मध्ये नमूद केल्यानुसार असणार आहे. कागदपत्रे संरक्षण प्रापण पोर्टल (defproc.gov/in) यावर उपलब्ध आहेत. कामाचे अंतिम स्वरूप पात्र उद्योगांसमवेत पूर्व-बोली सभेच्या आयोजनानंतर असणार आहे.
**३.** या विषयाधीन कोणतीही माहिती /स्पष्टीकरण खालील व्यक्तींकडून प्राप्त करता येईल :
(१) डॉ. ए. के. सतापथी, एससी-एफ. एनएमआरएल
डीआरडीओ संरक्षण मंत्रालय,
एमआयडीसी, शील - बदलापूर रोड, अंबरनाथ, ठाणे - ४२१५०६, महाराष्ट्र.
संपर्क क्र. - ०२५१-२६२३१५८
ईमेल - **akahayk.nmrl@gov.in, mmg.nmrl@gov.in**
**४.** स्वारस्य असलेले फर्म्स या ईओआयच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत अनुपालन विवरणासह (परिशिष्ट - १ मध्ये जोडलेले फॉरमॅट) संरक्षण प्रापण पोर्टल (defproc.gov.in) यावर ऑनलाईन प्रणालीत आवश्यक कागदपत्रांसमवेत त्यांचे स्वारस्य सादर करू शकतील.

**नोंद :**
१. कागदपत्रे दिनांकित १६ मार्च, २०२६ एनएमआरएल संदर्भ क्र. एनएमआरएल/ एमएमजी / ०४०१ / ०४ / ईओआय / सीईसी / १५३ / २०२५-२६ च्या अनुसार संरक्षण प्रापण पोर्टल (defproc.gov.in) यावर उपलब्ध आहेत आणि पार्ट १ व पार्ट २ येथील संबंधित फॉर्म्समध्ये दिनांकित १६ मार्च, २०२६ एनएमआरएल संदर्भ क्र. एनएमआरएल/ एमएमजी / ०४०१ / ०४ / ईओआय / सीईसी / १५३ / २०२५-२६ च्या अनुसार उपलब्ध आहेत व स्वारस्याच्या अभिव्यक्ती प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता डाउनलोड करता येतील.

**CBC10301/11/0184/2526**

